प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१
दुरध्वनी क्रं. ०७१२-२५५५६७३ फॅक्स क्रं.:- ०७१२-२५५०६७५
क्रं. अप्रमुवसं(संरक्षण)/कक्ष-१८/प्रक्र२७/२०-२१/३८१ दिनांक:- १८/१२/२०२०

# परिपत्रक

**विषय:- विभागीय वनगुन्हा नोंदवही अद्यावत ठेवणे आणि वनगुन्हे मासिक अहवाल सादर करणेबाबत.**

**संदर्भ** :- शासन निर्णय क्र. टिआरएस-०४/२०१४/प्र.क्र.७२/फ-६ दि.१३/०८/२०१४

वनगुन्हे तत्परतेने व काळजीपूर्वक हाताळण्यात यावेत, असे निर्देश शासनाने वेळोवेळी जारी केलेले आहेत. संदर्भिय शासन निर्णयातील परिच्छेद क्र.६ मध्ये वनगुन्हाची तत्परतेने नोंद, चौकशी व तपास ई. संदर्भात निर्देश देण्यात आले असून, सर्व गुन्हे वैधानिक तरतूदीनुसार तर्कसुसंगत निष्कर्षापर्यंत आणले जातील, याबाबत पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहे-

*वन गुन्हे निदर्शनास आल्यानंतर किंवा यथास्थितीत वरीलप्रमाणे वन गुन्हयाबाबत प्रथम प्रतिवृत्त प्राप्त झाल्यानंतर संबंधित प्राधिका-यांनी संदर्भ क्र.२ ते ५ अनुसार त्यांना सोपविण्यात आलेल्या अधिकारांच्या अधीन राहून विनाविलंब कायदेशीर कार्यवाही सुरु करावी. गुन्हयाबाबत तपास व चौकशी करण्यासाठी उक्त संदर्भाद्वारे विविध पातळीवर अधिका-यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. नोंद झालेल्या प्रत्येक वनगुन्हा संबंधित अधिनियमानुसार तर्कसुसंगत निष्कर्षा (logical conclusion) पर्यंत आणला जाईल, याची वैयक्तिक आणि संयुक्तपणे जबाबदारी वनपरिक्षेत्र अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक आणि उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/उपविभागीय वन अधिकारी यांची राहील.*

२.० वनगुन्हे हाताळण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती नुकत्याच प्रकाशित झालेल्या महाराष्ट्र वन संहिता, खंड-२ मधील परिच्छेद क्र.६.१२ मध्ये विषद करण्यात आलेली असुन, क्षेत्रिय वन अधिका-यांच्या सोयीसाठी त्याचे मराठी भाषांतर या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.अप्रमुवसं(संरक्षण)/कक्ष-१८/प्रक्र२७/३४६/२०-२१ दि.१४ डिसेंबर, २०२० अन्वये सर्व संबंधितांना पाठविण्यात आले आहे. सदर परिपत्रक वनविभागाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

३.० पुर्वीपासूनच वनरक्षक स्तरावर नोंदविण्यात आलेल्या वनगुन्हयाबाबत प्रथम अहवालाची पहिली प्रत विभागीय कार्यालयास तात्काळ पाठविली जावी, अशी तरतूद आहे. शासनास्तरावरुन तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांप्रमाणे वनगुन्हे प्रकरण विनाविलंब हाताळण्याबाबतची प्राथमिक जबाबदारी उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांची आहे. यादृष्टीकोणातून त्यांचे कार्यक्षेत्रात घडलेल्या गुन्हयाबाबतची प्राथमिक माहिती त्यांना वेळीच मिळावी, हे अपेक्षित आहे. सबब वनगुन्हयाबाबत प्रथम अहवालाची पहिली प्रत विभागीय कार्यालयास तात्काळ सादर होणे क्रमप्राप्त आहे. विभागीय कार्यालयास प्राप्त होताच त्याची दखल घेवून गुन्हयाच्या गांभिर्यानुसार उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी हे संबंधितांना पुढील योग्य निर्देश देतील, हे ही अभिप्रेत आहे. त्याचबरोबर, विभागीय वनगुन्हा नोंदवहीत त्याची नोंद घेऊन तर्कसुसंगत निष्कर्षापर्यंत आणले जातील, याची सुनिश्चिती करण्यासाठी सुध्दा विभागीय वनगुन्हा नोंदवही अद्यावत होणे अपरिहार्य ठरते. नोंदवहीत, गुन्हयाची नोंद करणेपासून ते अंतिम टप्प्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर प्रकरणाच्या प्रगतीबाबत अभिलेखन केले जाणेही आवश्यक आहे.

४.० उपरोक्त पध्दतीचा अवलंब होत आहे किंवा कसे, याबाबत आढावा घेण्याच्या दृष्टीने नागपूर, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर आणि गडचिरोली वनवृत्तातील वनविभागांच्या गुन्हा नोंदवहीचे अवलोकन केले असता, खालील बाबी निदर्शनास आल्या-

४.१) विभागीय कार्यालयात एकत्र वनगुन्हा नोंदवही ठेवली जात नसून, काही ठिकाणी सहाय्यक वनसंरक्षक स्तरावर, तर काही ठिकाणी फक्त वनपरिक्षेत्र अधिकारी स्तरावर नोंदवही ठेवली जाते.

४.२) उक्त नोंदवहया देखील अद्यावत नाहीत.

४.३) नोंदवहयात, उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याने ते वनगुन्हयांवर कसे संनियंत्रण ठेवतात, याचा बोध होत नाही.

४.४) विभागीय स्तरावर वनगुन्हा नोंदवही अद्यावत नसल्याने उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी वरिष्ठांना वनगुन्हयांबाबतचा नियतकालिक अहवाल कोणत्या आकडेवारीच्या आधारे सादर करतात, याचाही अर्थबोध होत नाही.

४.५) एकंदरीत, वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून प्राप्त आकडेवारीची कोणतीही छाननी न करता, त्याची गोळाबेरीज करुन नियतकालिक अहवाल वृत्तस्तरापर्यंत सादर केल्याचे निदर्शनास आले आहे.

४.६) उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांचेकडून उपरोक्तप्रमाणे प्राप्त अहवालाची कोणतीही छाननी न होता, वृत्तस्तरावरुन जसाचा तसा अहवाल संकलित करुन या कार्यालयास सादर केला जातो.

४.७) वनगुन्हयाच्या संनियंत्रणाकरीता ऑनलाईन पध्दतसुध्दा काही प्रमाणात वापरात आहे. तथापि, ऑनलाईन वरील उपलब्ध आकडेवारीचे बारकाईने अवलोकन केले असता दिसून आले आहे की वनगुन्हयांबाबतची नोंद अद्यावत नाही. काही प्रमाणात नोंद झाली असुनही वनगुन्हयाबाबत पुढे नेमकी कोणती कार्यवाही होत आहे, हे कळून येत नाही.

५.० शासनाने वेळोवेळी निर्देशित केल्यानुसार, तसेच प्रचलित वैधानिक तरतुदींचा विचार करता, वनगुन्हयांबाबत प्रगतीचे संनियंत्रण केले जाईल तसेच ते तर्कसुसंगत निष्कर्षापर्यंत विहीत कालावधीतच आणले जातील, यादृष्टीने पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत-

५.१) विभागीय कार्यालयात तसेच स्वतंत्र उपविभागात वनगुन्हयाबाबत एकच नोंदवही ठेवली जाईल, याची उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांनी सुनिश्चिती करावी. सदर नोंदवही, ही १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कॅलेंडर वर्षानुसार ठेवण्यात यावी.

५.२) संदर्भिय शासन निर्णयातील परिच्छेद ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, तसेच महाराष्ट्र वन संहिता, खंड-२ मधील परिच्छेद क्र.६.१२.०२ मध्ये नमूद केल्यानुसार, वनगुन्हयाबाबत प्रथम अहवालाची पहिली प्रत २४ तासाच्या आत विभागीय कार्यालयास पोहोचेल, याची सुनिश्चिती प्रत्येक स्तरावर करण्यात यावी.

५.३) वरीलप्रमाणे प्रथम अहवालाची प्रत विभागीय कार्यालयास प्राप्त होताच, उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांनी त्याची तात्काळ दखल घ्यावी.

५.४) वनगुन्हयाच्या गांभिर्यानुसार पुढे करावयाची कार्यवाहीबाबत काही विशेष सुचना द्यावयाची असल्यास, उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांनी त्यानुसार संबंधितांना औपचारिक निर्देश जारी करावे.

५.५) विविध परिक्षेत्राकडून प्राप्त होणारा प्रथम अहवाल, एकाच क्रमवारीने विभागीय नोंदवहीत नोंदविले जातील. कोणत्याही परिस्थितीत वेगवेगळया उपविभाग किंवा परिक्षेत्रानुसार नोंदवहीत वेगवेगळे भाग किंवा पाने विहीत केले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

५.६) त्याचप्रमाणे, विविध प्रकारचे गुन्हे, जसे अवैध वृक्षतोड, अवैध वाहतूक, वनवणवा, अतिक्रमण, अवैध चराई, वन (संवर्धन) अधिनियम तसेच वन्यजीवसंबंधी गुन्हे एकाच क्रमवारीने नोंदवहीत नोंदविण्यात यावे. एकंदरीत, गुन्हयाच्या वर्गवारीनुसार नोंदवहीत वेगवेगळया वर्गवारीने गुन्हयांची नोंद होता कामा नये.

५.७) भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२, वन (संवर्धन) अधिनियम, १९८०, इत्यादी अंतर्गतचे प्रत्येक गुन्हयाचे प्रथम प्रतिवृत्त, तपास, चौकशी, तक्रार दाखल करणे, अभिसंधान व सरकारजमा, इत्यादी चे आदेश तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५३, ५४ अंतर्गत पारित आदेश व गुन्हयाची नोंद झाल्यानंतर कनिष्ठ अधिका-यांद्वारे दरम्यानचे काळात प्रत्येक टप्प्यावर वेळोवेळी कळविलेला अहवाल, इत्यादी नोंदवहीत नोंदविण्यात यावे.

५.८) विभागीय वनगुन्हा नोंदवही व्यतिरीक्त, महाराष्ट्र वन संहिता, खंड-२ मधील परिच्छेद क्र.६.१२ मध्ये विषद केल्यानुसार परिमंडळ अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी तसेच सहाय्यक वनसंरक्षक स्तरावर त्यांचे कार्यक्षेत्रापुरता स्वतंत्र गुन्हा नोंदवही ठेवण्यात यावी.

५.९) विभागीय गुन्हा नोंदवही अद्यावत राखली जाईल आणि गुन्हे प्रकरणांशी संबंधित सर्व नियतकालिक अहवाल या नोंदवहीच्या आधारे वरिष्ठांना सादर केले जातील, उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी याची सुनिश्चिती करतील.

५.१०) वर निर्देशित केल्याप्रमाणे, गुन्हयाचे संनियंत्रण करण्याकरीता **कॅलेंडर वर्षानुसार** येत्या १ जानेवारी, २०२१ पासून वरीलप्रमाणे विविध स्तरावर वनगुन्हा नोंदवहया ठेवण्यात याव्यात. उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांनी वरिष्ठांना सादर केल्या जाणारा नियतकालिक अहवाल विभागीय नोंदवहीतील आकडेवारीप्रमाणे सादर केला जाईल, याची सुनिश्चिती करण्यासाठी प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या शेवटी वनगुन्हयाबाबतचा गोषवारा सोबतच्या **तक्ता-१** प्रमाणे नोंदवहीतच तयार करावा आणि त्याच आकडेवारीच्या आधारे वनविभागाचा मासिक अहवाल **दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी** वृत्त प्रमुखांना सादर करावा.

५.११) भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत सरकारजमा प्रकरणाबाबत कलम ६१-A ते कलम ६१-G बाबतची माहिती सोबतच्या **तक्ता क्र.२** प्रमाणे नोंदवहीतच तयार करावी आणि त्याच आकडेवारीच्या आधारे वनविभागाचा मासिक अहवाल **दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी** वृत्त प्रमुखांना सादर करावा.

५.१२) विभागीय कार्यालयाकडून वृत्तप्रमुखांना सादर होत असलेली माहिती विभागीय गुन्हे नोंदवहीच्या आधारेच होत आहे, याची सुनिश्चिती होण्याच्या दृष्टीने उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी हे त्यांचे कार्यालयातील वनगुन्हा नोंदवहीतील कॅलेंडर महिन्याच्या शेवटी, वरीलप्रमाणे तयार झालेला गोषवारा, त्याखाली त्यांचे नाव, स्वत:च्या स्वाक्षरी व शिक्क्यासह गोषवा-याची प्रत आपले मासिक अहवालाबरोबर वृत्तप्रमुखांना सादर करतील. कोणत्याही परिस्थितीत सदर गोषवा-याची प्रत 'करीता' म्हणून सादर होता कामा नये.

५.१३) वरीलप्रमाणे विभागाकडून प्राप्त झालेली माहिती संकलित करुन, वृत्तप्रमुख यांनी वृत्ताचा मासिक अहवाल **दर महिन्याच्या १५ तारखेपूर्वी** या कार्यालयास सादर करावा.

६.० कॅलेंडर वर्ष २०२१ पासून (१ जानेवारी, २०२१ पासून) वर विहीत केलेप्रमाणे गुन्हेविषयक मासिक अहवाल सादर केले जातील.

**सहपत्र**- वरीलप्रमाणे

(संजीव गौड)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण)

**प्रति,**

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
महाव्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ (सर्व)
मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षक (सर्व)
क्षेत्र संचालक, व्याघ्र राखीव (सर्व)
उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी (प्रा) (सर्व)
उपसंचालक, व्याघ्र राखीव (सर्व)
विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) (सर्व)
विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ (सर्व)
सहाय्यक वनसंरक्षक (सर्व)
वनपरिक्षेत्र अधिकारी (सर्व)

**प्रतिलीपी**

प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
व्यवस्थापकीय संचालक, वनविकास महामंडळ, नागपूर

## विभागीय वनगुन्हा नोंदवही : प्रपत्र - १

[अप्रमुवसं(संरक्षण) यांचे कडील परिपत्रक क्र.: कक्ष-१८/प्रक्र२७/ ३८१ /२०२०-२१, दिनांकः १८.१२.२०२० मधील सहपत्र]

### गुन्हयांचा गोषवारा

(Abstract of Offence Cases)

| विभाग | वन परिक्षेत्र | वर्गवारी | मागील महिन्या अखेर | | | | चालू महिन्यात | | | | | चालू महिन्या अखेर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | तपास अथवा चौकशी करिता प्रलंबित | सक्षम प्रधिकारी कडे प्रलंबित | न्यायालयात प्रलंबित | एकूण (४+५+६) | नोंदलेले गुन्हे | सक्षम प्रधिकारीस सादर | न्यायालयात दाखल केलेले | सक्षम प्रधिकारीद्वारे निकाली काढलेले | न्यायालयाद्वारे निकाली काढलेले | तपास अथवा चौकशी करिता प्रलंबित (४+८-९-१०) | सक्षम प्रधिकारी कडे प्रलंबित (५+९-११) | न्यायालयात प्रलंबित (६+१०-१२) | एकूण (१३+१४+१५) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| विभागाचे नांव | वन परिक्षेत्र-१ | १. अवैध वृक्ष तोड | | | | | | | | | | | | | |
| | | २. अवैध वहातूक | | | | | | | | | | | | | |
| | | ३. आग | | | | | | | | | | | | | |
| | | ४. चराई | | | | | | | | | | | | | |
| | | ५.वन्यजीव | | | | | | | | | | | | | |
| | | ६. अतिक्रमण | | | | | | | | | | | | | |
| | | ७. इतर | | | | | | | | | | | | | |
| | | एकूण | | | | | | | | | | | | | |
| | वन परिक्षेत्र-२ | १. अवैध वृक्ष तोड | | | | | | | | | | | | | |
| | | २. अवैध वहातूक | | | | | | | | | | | | | |
| | | ३. आग | | | | | | | | | | | | | |
| | | ४. चराई | | | | | | | | | | | | | |
| | | ५.वन्यजीव | | | | | | | | | | | | | |
| | | ६. अतिक्रमण | | | | | | | | | | | | | |
| | | ७. इतर | | | | | | | | | | | | | |
| | | एकूण | | | | | | | | | | | | | |
| | वन परिक्षेत्र-३,४,५, इत्यादी | | | | | | | | | | | | | | |
| | विभागीय गोषवारा | १. अवैध वृक्ष तोड | | | | | | | | | | | | | |
| | | २. अवैध वहातूक | | | | | | | | | | | | | |
| | | ३. आग | | | | | | | | | | | | | |
| | | ४. चराई | | | | | | | | | | | | | |
| | | ५.वन्यजीव | | | | | | | | | | | | | |
| | | ६. अतिक्रमण | | | | | | | | | | | | | |
| | | ७. इतर | | | | | | | | | | | | | |
| | | एकूण | | | | | | | | | | | | | |

**विभागीय वनगुन्हा नोंदवही : प्रपत्र - २**

[अप्रमुवसं(संरक्षण) यांचे कडील परिपत्रक क्र.: कक्ष-१८/प्रक्र२७/ ३८१ /२०२०-२१, दिनांक: १८.१२.२०२० मधील सहपत्र]

**भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत जप्तीची (सरकारजमा) कार्यवाहीचा गोषवारा**

(Abstract of Confiscation Proceedings under the Indian Forest Act, 1927)

| विभाग | वन परिक्षेत्र | मागील महिन्या अखेर | | | | | | चालू महिन्यात | | | | | | | | | चालू महिन्या अखेर | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तपास अथवा चौकशी अंतर्गत | कलम ६१-A अंतर्गतचे प्रधिकारी कडे प्रलंबित | कलम ६१-C अंतर्गतचे प्रधिकारी कडे प्रलंबित | कलम ६१-D अंतर्गतचे प्रधिकारी कडे प्रलंबित | वरिष्ठ न्यायालयां कडे प्रलंबित | एकूण प्रकरणे (३+४+५+६+७) | तपास अथवा चौकशी करिता नव्याने आलेली प्रकरणे | कलम ६१-A अंतर्गतचे प्रधिकारी कडे नव्याने आलेली प्रकरणे | कलम ६१-A अंतर्गतचे प्रधिकारी द्वारे निकाली काढलेली प्रकरणे | कलम ६१-C अंतर्गतचे प्रधिकारी कडे नव्याने आलेली प्रकरणे | कलम ६१-C अंतर्गतचे प्रधिकारी द्वारे निकाली काढलेली प्रकरणे | कलम ६१-D अंतर्गतचे प्रधिकारी कडे नव्याने आलेली प्रकरणे | कलम ६१-D अंतर्गतचे प्रधिकारी द्वारे निकाली काढलेली प्रकरणे | वरिष्ठ न्यायालयां कडे नव्याने दाखल झालेली प्रकरणे | वरिष्ठ न्यायालयां द्वारे निकाली काढलेली प्रकरणे | तपास अथवा चौकशी अंतर्गत प्रलंबित (३+९-१०) | कलम ६१-A अंतर्गतचे प्रधिकारी कडे प्रलंबित (४+१०-११) | कलम ६१-C अंतर्गतचे प्रधिकारी कडे प्रलंबित (५+१२-१३) | कलम ६१-D अंतर्गतचे प्रधिकारी कडे प्रलंबित (६+१४-१५) | वरिष्ठ न्यायालयां कडे प्रलंबित (७+१६-१७) | एकूण प्रकरणे (१८+१९+२०+२१+२२) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| | वन परिक्षेत्र-१ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | वन परिक्षेत्र-२ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | वन परिक्षेत्र – ३,४,५, इत्यादी | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | विभागीय गोषवारा | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |